पुण्य नगरी

बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६

# विवेकानंद महाविद्यालय प्रथम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या वार्षिक नियतकालिक स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, यामध्ये विवेकानंद कॉलेजच्या विवेक वार्षिक नियतकालिकाने बिगर व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक पटकावला. या यशामुळे महाविद्यालयाच्या नावलौकिकात मोठी भर पडली असून, महाविद्यालयाने यशस्वी निकालाची परंपरा कायम राखली आहे. वैयक्तिक पारितोषिकांमध्ये विद्यार्थ्यांनी विविध साहित्य प्रकारात १५ पारितोषिके पटकावली. या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांनी संपादक मंडळ व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

पुढारी बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६

# विवेकानंद कॉलेजचे विविध स्पर्धांमध्ये यश

**कोल्हापूर :** स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहानिमित्ताने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे राज्यस्तरीय स्पर्धेच्या विभागीयस्तरावर उत्कृष्ट कामगिरी करत विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी, शिक्षकांनी यश संपादन केले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जुना बुधवार पेठ येथे विभागीय स्पर्धा पार पडली. महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी गटातील यशस्वितांमध्ये अनुराधा कांबळे - प्रथम क्रमांक (वक्तृत्व स्पर्धा), शुभम दरगडे - प्रथम (चित्रकला स्पर्धा), सुप्रिया कुंभार - द्वितीय (कराओके स्पर्धा) यात यश संपादन केले. गुरुदेव कार्यकर्ता गटातील सागर कांबळे - द्वितीय (कराओके स्पर्धा), प्रा. सतीश उपळावीकर - तृतीय (चित्रकला स्पर्धा), प्रियांका कांबळे - तृतीय (वक्तृत्व स्पर्धा) यामध्ये यश मिळवले.